**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र १९४/१५ मधील निशाणी ५२ वरील आदेश</u>**
(<u>दिनांक २३.०२.२०१६</u>)

०१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांच्या म्हणण्या प्रमाणे, वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपाचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३७ ने दावा मिळकत सर्व्हे क्र. २५८/१/१अ/१ ही मिळकत नामदेव रामचंद्र गायकवाड यांचेकडून खरेदी घेतली असून ती दस्त प्रतिवादी क्र. ३७ कडून गहाळ झाल्यामुळे त्यांना कैफियत देणेस ६५ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरील ६५ दिवसाचा विलंब माफ करण्याची विनंती प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी केली आहे.

०३. या अर्जास उजर घेत वादीने आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ५२ खाली मांडले. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादीचा अर्ज हा कायदेशीर व खरा नाही. प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेले कारण खरे नाही. सदर दाव्यामध्ये कैफियत देण्यास प्रतिवादींना ६५ दिवसांचा विलंब झालेला आहे. ते झालेल्या विलंबास प्रतिवादी यांनी योग्य कारण दिलेले नाही. सबब तो नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| | ***<u>मुद्दे</u>*** | ***<u>निष्कर्ष</u>*** |
|---|---|---|
| ०१ | प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ हे मागणी केल्या प्रमाणे विलंब माफ होवून मिळणेस पात्र आहेत काय? | *..होय.* |
| ०२ | कोणता आदेश ? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ व २:–</u>**

०५. उभयंताच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्रे तसेच उभंयताना मान्य असलेल्या बाबी पाहता ही बाब आढळून येते की, प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांना समन्स प्राप्त झाल्या पासुन ९० दिवसाच्या आत कैफियत दाखल करणे आवश्यक असतांना देखील त्यांनी ९० दिवसाच्या आत कैफियत दिलेली नाही. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांना कैफियत दाखल करण्यास ६५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण दाव्यासाठी आवश्यक असलेली खरेदी दस्त गहाळ झाल्यामुळे नमूद केले आहे. सदरचे कारण हे ग्राहय धरण्यासारखे नाही. परंतू दावा गुणावगुणावर चालण्यासाठी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. परंतू प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी कैफियत दाखल करण्यास जो विलंब केला आहे त्यासाठी प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांना आदेशीत करण्यात येते की, त्याने वादीला कॉस्ट/खर्च म्हणून रक्कम रु ७५/– दयावे. या सर्व बाबीचा विचार करुन मुद्या क्रमांक ०१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्या क्र २ च्या उत्तरा दाखल वरील चर्चेस अनुषंगून खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी वादीस कॉस्ट रु ७५/– दिल्यानंतर कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**(श्रीमती आर. आर. संकपाळ)**
सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर,
सांगोला

दिनांक : २३/०२/२०१६

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 23.02.2016 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 23.02.2016 |